माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१६८०**

**अपिलार्थी श्री. किरण राम सावंत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव**

विद्या प्रसारक मंडळाचे विद्या मंदीर, छत्रपती शिवाजी रोड, दहिसर (पू), मुंबई-६८

**प्रथम अपिलीय अधिकारी**

विद्या प्रसारक मंडळाचे विद्या मंदीर, छत्रपती शिवाजी रोड, दहिसर (पू), मुंबई-६८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२२ | | २९.०८.२०२२ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थींनी दि. ०१.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) अंतर्गत बाबींची आर्थिक वर्ष ०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२३ या कालावधीत संकेस्थळावर कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित केलेली माहितीच्या सत्यप्रतींबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २९.०८.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणातील उपलब्ध माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १०.१२.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास
२९-९-२०२५

**मुंबई**
**दिनांक : २९.०९.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**